# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः13.07.2025** **वारःरविवार**

---

1. राष्ट्र निर्मितीमध्ये युवकांची भूमिका महत्वपूर्ण असून त्यांनी राष्ट्र आणि जनसेवा करावी : पंतप्रधानांचं प्रतिपादन
2. १६ व्या रोजगार मेळाव्यात ५१ हजारांहून अधिक युवकांना नियुक्ती पत्रांचं वाटप
3. अहमदाबाद विमान दुर्घटनेबाबत, अंतिम अहवाल प्राप्त होईपर्यंत कोणतेही निष्कर्ष न काढण्याची नागरी विमान वाहतूक राज्यमंत्र्याची सूचना
4. अमेरिकेची मेक्सिको आणि युरोपियन युनियनमधून होणाऱ्या आयातीवर ३० टक्के कर लावण्याची घोषणा

आणि

5. मध्यप्रदेश, राजस्थान, गुजरात, उत्तराखंडमध्ये आज मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा इशारा

**<u>रोजगार मेळावा</u>**

नवनियुक्त युवक-युवतींची राष्ट्र निर्मितीमध्ये महत्वपूर्ण भूमिका असून या माध्यमातून त्यांनी राष्ट्र आणि जनसेवा करावी असं पंतप्रधानांनी म्हट्लं आहे. रोजगार मेळावा हा युवकांना सक्षम बनवण्याच्या आणि विकसित भारताच्या उभारणीसाठी त्यांना प्रोत्साहन देण्याकरता सरकारच्या वचनबद्धतेचं प्रतिबिंब आहे. भारतात लोकसंख्या आणि लोकशाही या दोन मोठ्या शक्ती आहेत. असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हट्लं आहे. काल दूरस्थ माध्यमातून विविध सरकारी विभागांमध्ये नवनियुक्त ५१ हजारांहून अधिक युवक युवतींना नियुक्ती पत्रांचं वाटप केल्यानंतर १६ व्या रोजगार मेळाव्यात ते बोलत होते.

विविध सरकारी विभागातल्या सेवांसाठी 51 हजार जणांना ठिकठिकाणी काल नियुक्तीपत्रं प्रदान करण्यात आली. त्यामध्ये सर्वाधिक ४१ हजार नियुक्तीपत्रं रेल्वे खात्यामार्फत देण्यात आली आहेत. महिला, दिव्यांग आणि दुर्गम भागातील उमेदवारांना यामध्ये विशेष प्राधान्य देण्यात आलं आहे.

महाराष्ट्रात नागपूर इथं केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, मुंबईत केंद्रीयमंत्री पीयूष गोयल, तर पुण्यात केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या उपस्थितीत प्रातिनिधिक नियुक्तीपत्रांचं वाटप करण्यात आलं. सरकार रोजगार निर्मितीच्या क्षेत्रात केवळ आश्वासनांपुरतं मर्यादित नसून प्रत्यक्षात कृतीच्या माध्यमातून परिवर्तन घडवत असल्याचं प्रतिपादन नागरी हवाई वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी पुण्यात

रोजगार मेळाव्याच्या कार्यक्रमात केलं. अशा रोजगार मेळाव्याच्या माध्यमातून युवकांना अधिक सक्षम आणि आत्मनिर्भर होण्याची दिशा मिळते. हा उपक्रम म्हणजे युवाशक्तीला सक्षम करण्याचा सरकारचा प्रयत्न असल्याचं मोहोळ यांनी सांगितलं. पुण्यात आयोजित कार्यक्रमात २०० जणांना नियुक्तीपत्र देण्यात आली यावेळी राज्यसभा खासदार मेधा कुलकर्णी, रेल्वेचे पुणे विभागाचे व्यवस्थापक राजेशकुमार वर्मा उपस्थित होते. टपाल खाते, रेल्वे, सीआयएसएफ, बँकासहीत विविध केंद्र सरकारी कार्यालयांत सेवेसाठी ही नियुक्तीपत्रं देण्यात आली. मुंबईत छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस इथे कार्यक्रमात केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांच्या प्रमुख उपस्थितीत रोजगार मेळावा झाला. यावेळी राज्याचे कौशल्य विकासमंत्री मंगल प्रभात लोढा आणि मध्य रेल्वेचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

**<u>मोहोळ</u>**

अहमदाबाद विमान दुर्घटनेबाबत, प्राथमिक अहवाल प्राप्त झाला असून सखोल चौकशी करून अंतिम अहवाल प्राप्त होणार आहे, तोपर्यंत कोणतेही निष्कर्ष काढू नका असं केंद्रीय नागरी हवाई वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी काल पुण्यात रोजगार मेळाव्याच्या कार्यक्रमानंतर पत्रकारांशी बोलताना सांगितल. प्राथमिक अहवाल एक महिन्यात मिळाला असून सर्व प्रक्रिया पूर्ण वेगाने सुरू असल्याचं सांगून ते म्हणाले की, पूर्वी ब्लॅक बॉक्स बाहेरच्या देशात पाठवले जायचे, मात्र आता देश आत्मनिर्भर असल्याने ब्लॅक बॉक्सची प्रक्रिया आणि तपासणीचं काम आपल्या देशातच होत आहे.

**<u>नामांकन</u>**

केंद्रीय युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्रालयाच्या तेनझिंग नोर्गे राष्ट्रीय साहस पुरस्कार २०२४ या मानाच्या पुरस्कारासाठी नामांकने मागवण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. जमीन, पाणी आणि हवाई क्षेत्रातील साहसी कामगिरीसाठी आणि या क्षेत्रातल्या विशेष आजीवन कार्यासाठी हा पुरस्कार दिला जातो. कास्य मूर्ती , प्रमाणपत्र, आणि १५ लाख रुपयांचं रोख बक्षीस असं या पुरस्काराचं स्वरूप आहे. 15 जुलैपर्यंत अवार्ड्स डॉट जीओव्ही डॉट इन या संकेतस्थळावर नमांकाने स्वीकारण्यात येणार आहेत.

**<u>इडी</u>**

सक्तवसूली संचालनालयाने रिअल इस्टेट मधील पर्ल्स अॅग्रोटेक कॉर्पोरेशन लिमिटेड आणि तिच्या संचालक तसंच प्रवर्तकांच्या चौकशीच्या संदर्भात ७ शे ६२ कोटी ४७ लाख रुपयांच्या पंजाब, हरियाणा, दिल्ली, महाराष्ट्र आणि ऑस्ट्रेलियामधील स्थावर मालमत्ता जप्त केल्या आहेत. या संस्थेने मोठ्या प्रमाणात फसव्या सामूहिक गुंतवणूक योजना राबवून गुंतवणूकदारांकडून ४८ हजार कोटी रुपये गोळा केले आणि त्याचा गैरवापर केला असल्याचं संचालयानं म्हटलं आहे.

**<u>अमेरिका</u>**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी मेक्सिको आणि युरोपियन युनियनमधून होणाऱ्या आयातीवर ३० टक्के कर लावण्याची घोषणा केली. १ ऑगस्टपासून हा कर लागू होईल. युरोपियन युनियनला लिहिलेल्या पत्रात ट्रम्प यांनी अमेरिकेची व्यापार तूट ही राष्ट्रीय सुरक्षिततेसाठी धोका असल्याचं म्हट्लं आहे. प्रमुख व्यापारी भागीदारांसोबत काही आठवड्यांच्या अयशस्वी वाटाघाटींनंतर ही घोषणा करण्यात आली. ट्रम्प

सरकारनं जपान, दक्षिण कोरिया, कॅनडा आणि ब्राझीलसह अनेक देशांवर नवीन आयात शुल्क नुकतंच जाहीर केलं आहे . २७ यूरोपीयन सदस्यीय गटातील वस्तूंवर ३० टक्के शुल्क लादण्याच्या अमेरिकेच्या निर्णयावर युरोपियन युनियनच्या नेत्यांनी टीका केली असून यामुळे महागाई वाढेल आणि विकासामध्ये अडथळा येईल असं म्हटलं आहे.

**<u>लंकाघरे</u>**

श्रीलंकेचे पंतप्रधान डॉक्टर हरिनी अमरसुरिया आणि भारतीय उच्चायुक्त संतोष झा यांनी श्रीलंकेतील अनुराधापुरा इथल्या एलापथ-गामा या गावात ९० नव्याने बांधलेल्या घरांचं उद्घाटन केलं. ही घरं भारताच्या सहकार्याने श्री शोभिता नाहिमिगामा प्रकल्पांतर्गत बांधण्यात आली आहेत. अमरसुरिया यांनी मदुलुवावे सोभिता थेरो यांच्या वारशाचं  कौतुक करत वंचित समुदायांच्या उत्थानासाठी भारताने दिलेल्या पाठिंब्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. दोन्ही देशांमधील विकास-सहकार्य मजबूत करण्याच्या दिशेने हा प्रकल्प महत्वाचा मानला जात आहे.

**<u>धूळ</u>**

वाळू आणि धुळीची वादळे, आणि त्यांचे वेगवेगळ्या स्तरावर होणारे घातक परिणाम ओळखून, संयुक्त राष्ट्रांच्या महासभेने १२ जुलै हा दिवस वाळू आणि धुळीच्या वादळांविरुद्धचा आंतरराष्ट्रीय दिवस म्हणून पाळला. वाळू आणि धुळीच्या वादळांचा परिणाम आता दीडशेहून अधिक देशांमधील ३३ कोटींहून  अधिक लोकांवर होत असून यामुळे आरोग्य, अर्थव्यवस्था आणि पर्यावरणाचं  मोठं नुकसान होत असल्याचं जागतिक हवामान संघटनेनं म्हटलं आहे.  दरवर्षी सुमारे २ अब्ज टन धूळ उत्सर्जित होते. यातली ८० टक्क्यांहून अधिक धूळ उत्तर आफ्रिका आणि मध्य पूर्वेतील वाळवंटातून येऊन ती जगभर पसरत असल्याचं  अहवालात म्हट्लं आहे. मध्य पूर्व आणि उत्तर आफ्रिका या भागात वादळांशी संबंधित वार्षिक खर्च दीडशे अब्ज डॉलर्सपर्यंत जातो. संयुक्त राष्ट्रांच्या महासभेनं २०२५ ते २०३४ हे दशक याच्या कृतीचं समर्पित दशक घोषित केलं आहे.

**<u>बारबंद</u>**

महाराष्ट्र सरकारच्या करवाढीच्या निषेधार्थ राज्यातील २० हजारांपेक्षा अधिक मद्यालयं उद्या बंद पाळणार आहेत. इंडियन हॉटेल अँड रेस्टॉरंट असोसिएशनने काल दिलेल्या माहितीनुसार, राज्य सरकारच्या कर वाढीला विरोध करण्यासाठी हा बंद आहे. एका वर्षाच्या कालावधीत मद्यावरील मूल्यवर्धित कर १० टक्के करणे, वार्षिक परवाना शुल्कात १५ टक्के वाढ आणि उत्पादन शुल्कात ६० टक्के वाढ करण्याच्या पार्श्वभूमीवर हा बंद पुकारण्यात आला आहे.

**<u>क्रिकेट</u>**

अँडरसन-तेंडुलकर क्रिकेट मालिकेतील तिसऱ्या कसोटी सामन्याच्या चौथ्या दिवशी यजमान इंग्लंड संघ आज भारताविरुद्धचा आपला  दुसरा डाव, बिनबाद २ धावांवर खेळणार आहे. सामना भारतीय वेळेनुसार दुपारी साडेतीन वाजता सुरू होईल.

पहिल्या डावात, इंग्लंडच्या ३८७ धावांच्या प्रत्युत्तरात, भारताचा डाव ३८७ धावांवर संपला होता. पाच कसोटी सामन्यांची मालिका १-१ अशी बरोबरीत आहे.

**विम्बल्डन**

विम्बल्डन टेनिसमध्ये, काल झालेल्या एकतर्फी अंतिम सामन्यात पोलंडच्या इगा स्वियातेकनं अमेरिकेच्या अमांडा अनिसिमोवाला केवळ ५७ मिनिटांत ६-०, ६-० असं हरवून आपलं सहावं ग्रँड स्लॅम विजेतेपद आणि विम्बल्डनमधलं पहिलं विजेतेपद जिंकलं. या विजयामुळे ती व्हीनस रोझवॉटर डिश जिंकणारी पहिली पोलिश महिला ठरली आहे.

दरम्यान, ज्युलियन कॅश आणि लॉयड ग्लासपूल यांनी विम्बल्डन २०२५ मध्ये इतिहास रचला. १९३६ नंतर पुरुष दुहेरीचं विजेतेपद जिंकणारी ही पहिली, पूर्ण ब्रिटिश जोडी ठरली आहे. या जोडीने ऑस्ट्रेलियाच्या रिंकी हिजिकाटा आणि नेदरलँड्सच्या डेव्हिड पेलला २-० असं पराभूत केलं . ८९ वर्षांपूर्वी पॅट ह्यूजेस आणि रेमंड टकी या ब्रिटिश जोडीने पुरुष दुहेरीचं विजेतेपद पटकावलं होतं.

**हवामान**

भारतीय हवामान विभागाने आज मध्यप्रदेश, राजस्थान, गुजरात, उत्तराखंडमध्ये मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा नारंगी बावटा जारी केला आहे. आगामी ३ ते ४ दिवसांत हिमाचल प्रदेश, उत्तराखंड आणि राजस्थानच्या काही भागात; तसंच दोन दिवस पश्चिम बंगाल, सिक्कीम, बिहार, झारखंड आणि ओडिशासह देशाच्या पूर्व भागातही मुसळधार पावसाची परिस्थिती कायम राहील. केरळ आणि कर्नाटकच्या किनारी भागात आज मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. देशाच्या ईशान्य भागातही वादळ आणि विजांसह हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे.

## याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.